Circular file

# कार्यालय,श्री शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती

जा.क्र.शि/अधि /प्रशा-५/ १०७३ /२०२० दिनांक : १३/३/२०२०

## कार्यालयीन परिपत्रक

प्रति,
**श्री शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती व्दारा**
**संचालित सर्व शाळा, महाविद्यालयाचे मुख्याध्यापक/प्राचार्य**
**वसतीगृहाचे अधिक्षक व इतर संस्थेचे संस्था प्रमुख,**

**विषय :- कोरोना विषाणु ( Virus) उपाययोजना व घ्यावयाचे काळजी बाबत.**

वरील विषयाचे अनुषंगाने श्री शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती व्दारा संचालीत सर्व महाविद्यालयाचे प्राचार्य व शाळेचे मुख्याध्यापक, वसतीगृहाचे अधिक्षक तसेच इतर संस्थेचे संस्था प्रमुख यांना कळविण्यात येते की, कोरोना विषाणु आजाराची लक्षणे ही मुख्यत्वे श्वसन संस्थेशी निगडीत असून ती सर्वसाधारणपणे Influnza आजारा सारखीच आहे. सर्दी,खोकला, श्वास घ्यायला त्रास होणे, न्युमोनिया अशी लक्षणे मुख्यत्वे करून असून कोरोना विषाणुचा प्रसार हा प्रामुख्याने हवेव्दारे त्याच प्रमाणे शिंकणे, खोकलणे, हस्तांदोलन करणे इत्यादि कारणामुळे होतो.

२. शासन स्तरावरून कोरोना आजाराची व्याप्ती वाढू नये यासाठी सार्वजनिक ठिकाणी गर्दीचे कार्यक्रम आयोजित करण्या पासून परावृत्त करण्याचे निर्देश झालेले आहे. कोरोना विषाणु आजार हा संसर्गजन्य आजार असल्याने यामुळे शाळा, महाविद्यालयात गर्दीचे कार्यक्रम ,स्नेह संमेलन, प्रदर्शनी असे कार्यक्रम घेण्यास टाळावे व इतरांना सुध्दा गर्दीचे कार्यक्रम घेण्यास परावृत्त करावे व अफवांवर विश्वास ठेवू नये.

३. कोरोना विषाणुचा वाढता प्रकोप लक्षात घेता तसेच सदर आजार हा हस्तांदोलन यामुळे पसरण्याची शक्यता लक्षात घेता शाळा,महाविद्यालयात,वसतीगृहात लावण्यात आलेले बायोमॅट्रीक मशिन तूर्तास उपयोगात आणु नये व दैनंदिन स्वाक्षरी रजिष्टरवर कर्मचा-यांच्या स्वाक्ष-या घेवून वेळ नमुद करण्याची कार्यवाही करावी.

तसेच वसतीगृहात राहाणा-या विद्यार्थी-विद्यार्थींनी यांना कोरोना विषाणुचा प्रकोप व त्या संबधीच्या उपाययोजना या संबधीची माहिती देण्यात यावी. तसेच भोजनामध्ये सुध्दा या बाबीची दक्षता घेण्यात यावी व संशयीत रूग्ण आढळल्यास तात्काळ शासकीय रूग्णालयात दाखल करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

सदर परिपत्रकाची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याची कार्यवाही करावी.

**सचिव,**
श्री शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती

प्रत सविनय सादर :-
मा.अध्यक्ष, श्री शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती यांचे स्विय सहाय्यक यांना माहितीकरीता.